महाराष्ट्र लोकसेवा आयोग
Maharashtra Public Service Commission

मुख्य कार्यालय : ५½, ७ व ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई ४०००२१ दूरध्वनी - २२७९५९०० फॅक्स : २२८८०५२४
फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा माळा, फोर्ट, मुंबई ४००००१ दूरध्वनी :२२६७०२१०/१४८/२४८,२२१०२२२२. फॅक्स : २२६७३९१५

ई-मेल – sec.mpsc@maharashtra.gov.in वेबसाईट - www.mpsc.gov.in, https://mahampsc.mahaonline.gov.in

# पशुधन विकास अधिकारी, महाराष्ट्र पशुसंवर्धन सेवा, गट-अ

**धारिका क्रमांक : १९४(१)(२)(४७)/२१३९/ पंधरा-अ**

**जाहिरात क्रमांक : १३/२०१९**

आयोगामार्फत **महाराष्ट्र शासनाच्या कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय व मत्स्यव्यवसाय विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्या आस्थापनेवरील** **पशुधन विकास अधिकारी, महाराष्ट्र पशुसंवर्धन सेवा, गट-अ (Livestock Development Officer, Maharashtra Animal Husbandry Services, Gr.A)** **या पदाच्या एकूण ४३५ जागांच्या** भरतीसाठी ऑनलाईन पद्धतीने **अर्ज** मागविण्यात येत आहेत. या पदासाठी अर्हताप्राप्त असलेले उमेदवार अर्ज करू शकतात.

**२. उपलब्ध पदसंख्या:- ४३५ (चालू रिक्त पदे ४०२ + ३३ ▼अनुशेष )**

| जात प्रवर्ग | अ.जा. | अ.ज. | वि.जा. (अ) | भ.ज. (ब) | भ.ज. (क) | भ.ज. (ड) | वि.मा.प्र. | इ.मा.व. | सा. व शै. मागासवर्ग | आ.दु.घ. | एकूण मागासवर्गीय | खुला | एकूण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | २३ | २१ | ३ | ५ | ५ | ३ | ३ | ८९+३३▼ | ६० | ४६ | २५८+३३▼ | १४४ | ४३५ |
| रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय सामाजिक /समांतर आरक्षणाचे विवरणपत्र खालीलप्रमाणे आहे. | | | | | | | | | | | | | |
| सर्वसाधारण | १५ | १४ | २ | ३ | ३ | २ | २ | ५८+३३▼ | ३९ | ३० | १६८+३३▼ | ९३ | २६१+३३▼ |
| अ)महिला (३०%) | ७* | ६* | १* | २* | २* | १* | १* | २७* | १८* | १४* | ७९* | ४३* | १२२* |
| ब) खेळाडू (५%) | १☑ | १☑ | - | - | - | - | - | ४☑ | ३☑ | २☑ | ११☑ | ७☑ | १८☑ |
| क) अनाथ (१%) | - | - | - | - | - | - | - | - | - | | - | १# | १# |
| ड) दिव्यांग (३%) | एकूण **४३५** जागांपैकी **०७** जागा चलनवलन विषयक दिव्यांगता किंवा मेंदुचा अर्धांगवायु **(Locomotor Disability or Cerebral Palsy)** व **०७** जागा श्रवण शक्तीतील दोष ( **Hearing Impairment)** या दिव्यांग उपप्रवर्गासाठी आरक्षित असून, दिव्यांग उमेदवार उपलब्ध न झाल्यास दिव्यांगासाठी आरक्षित असलेले पद खुल्या प्रवर्गामधून रिक्त ठेवण्यात येईल. | | | | | | | | | | | | |

*** उपलब्ध असल्यास महिलांसाठी आरक्षित** **☑ उपलब्ध असल्यास खेळाडूसाठी आरक्षित**

**▼ अनुशेषाची पदे** **# उपलब्ध असल्यास अनाथासाठी आरक्षित.**

**२.१** वर नमूद केलेल्या पदसंख्येत व आरक्षणामध्ये शासनाच्या संबंधित विभागाच्या सूचनेनुसार बदल होण्याची शक्यता आहे.

**२.२** कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभागाच्या शासन निर्णय क्रमांक पसंप्र २०११/प्र.क्र.४/ पदुम-१ दिनांक १० जानेवारी, २०१२ अनुसार प्रस्तुत पदासाठी श्रवण शक्तीतील दोष ( Hearing Impairment) व चलनवलन विषयक दिव्यांगता किंवा मेंदुचा अर्धांगवायु ( Locomotor Disability or Cerebral Palsy) असे दिव्यांगत्व असलेले उमेदवार अर्ज करण्यास पात्र आहेत. तथापि, अंधत्व किंवा क्षीणदृष्टी ( Blindness or Low Vision) असे दिव्यांगत्व असलेले उमेदवार अर्ज करण्यास अपात्र आहेत.

**२.३** महिला व बाल विकास विभागाच्या शासन निर्णय अमुजा-२०११/प्र.क्र.२१२/का-३ दिनांक ०२ एप्रिल, २०१८ अनुसार अनाथ आरक्षणासाठी दावा करणाऱ्या उमेदवारांनी प्राधिकृत अधिकाऱ्यांनी प्रमाणित केलेले विहीत नमुन्यातील प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक असेल. तसेच अनाथ आरक्षणासंदर्भात उपरोक्त शासन निर्णय तथा शासनाने वेळोवेळी घेतलेल्या निर्णयांच्या अनुषंगाने कार्यवाही करण्यात येईल. तसेच संबंधित भरती वर्षात अनाथ उमेदवार उपलब्ध न झाल्यास आरक्षणाचा अनुशेष पुढे न ओढता खुल्या प्रवर्गातून गुणवत्तेनुसार इतर उमेदवारांची नियुक्ती करण्यात येईल.

**२.४** वि.जा. (अ), भ.ज. (ब), भ.ज.(क) व भ.ज. (ड) या वर्गवारीसाठी आरक्षित असलेली पदे आंतरपरिवर्तनीय असून आरक्षित पदावर योग्य उमेदवार उपलब्ध न झाल्यास शासनाच्या अंतर्गत परिवर्तनीयतेच्या धोरणानुसार सदर पदासाठी वि.जा.(अ), भ.ज. (ब), भ.ज.(क) व भ.ज. (ड) यापैकी उपलब्ध वर्गवारीच्या उमेदवाराचा शासनाच्या अद्ययावत धोरणानुसार गुणवत्तेच्या आधारावर विचार करण्यात येईल.

**२.५** महिला आरक्षण व त्या संबंधातील नॉनक्रिमीलेयर (NCL) तसेच मागासवर्गीय व त्या संदर्भातील नॉनक्रिमीलेयर (NCL) प्रमाणपत्रांचा नमूना आणि इतर अटी व शर्तीबाबत उमेदवारांनी आयोगाच्या संकेतस्थळावरील "सरळसेवा भरती" विभागातील "उमेदवारांना सर्वसाधारण सूचनाचे काळजीपूर्वक अवलोकन करुनच त्याचे अनुपालन करावे.

**३. वेतनश्रेणी:- S-२०** रु.५६,१००-रु.१,७७,५०० + अधिक इतर भत्ते

**४. पात्रता:-** उमेदवार भारतीय नागरिक असावा.

**४.१ वय:- दिनांक १ डिसेंबर, २०१९ रोजी अमागास वर्गवारीकरीता ३८ वर्षे व मागास वर्गवारीकरीता ४३ वर्षापेक्षा जास्त नसावे.**

४.२ महाराष्ट्र शासनाच्या सेवेतील कर्मचा-यांना उच्च वयोमर्यादा लागू नाही.

४.३ शासन आदेशानुसार दिव्यांग व माजी सैनिक इत्यादींसाठी वयोमर्यादा नियमानुसार शिथिलक्षम राहील.

**४.४ पात्र खेळाडूंच्या बाबतीत कमाल वयोमर्यादा ४३ वर्षांपर्यंत शिथिलक्षम राहील.**

४.५ अपवादात्मक शैक्षणिक अर्हता किंवा अनुभव किंवा दोन्ही धारण करणा-या उमेदवारांच्या बाबतीत उच्च वयोमर्यादा शिथिल करण्याविषयी आयोग विचार करु शकेल. परंतु आयोगाच्या कार्यनियमावलीतील प्रमाणानुसार जेव्हा मुलाखतीसाठी पुरेसे उमेदवार प्राप्त होत नसतील तेव्हाच हा नियम विचारात घेतला जाईल. अशा प्रत्येक प्रकरणी उपलब्ध उमेदवारांच्या उच्चतम शैक्षणिक अर्हतेच्या दोन स्तर उच्च शैक्षणिक अर्हताप्राप्त उमेदवारच वयोमर्यादेत सवलतीकरीता विचारात घेतले जातील. अनुभवाच्या संदर्भात ज्या पदावरील किमान अनुभव मागितला असेल त्यापेक्षा वरिष्ठ पदावरील अनुभव वयोमर्यादा शिथिलीकरणास्तव विचारात घेतला जाईल.

४.६ I) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, क्रमांक: राक्रीधो-२००२/प्र.क्र.६८/क्रीयुसे-२, दिनांक १ जुलै, २०१६, शासन शुध्दीपत्रक क्रमांक: राक्रीधो-२००२/प्र.क्र.६८/क्रीयुसे-२, दिनांक १८ ऑगस्ट, २०१६ तसेच शासन शुध्दीपत्रक क्रमांक: राक्रीधो-२००२/प्र.क्र.६८/क्रीयुसे-२, दिनांक ११ मार्च, २०१९, आणि तदनंतर शासनाने यासंदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार, प्राविण्य प्राप्त खेळाडू व्यक्तीचे आरक्षण तसेच वयोमर्यादेतील सवलतीसंदर्भात कार्यवाही करण्यात येईल.

II) प्राविण्य प्राप्त खेळाडू व्यक्तीसाठी असलेल्या आरक्षणाचा दावा करणाऱ्या उमेदवारांच्या बाबतीत क्रीडा विषयक विहित अर्हता धारण करीत असल्याबाबत सक्षम प्राधिकाऱ्याने प्रमाणित केलेले खेळाचे प्राविण्य प्रमाणपत्र अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकाचे किंवा तत्पूर्वीचे असणे बंधनकारक आहे.

III) खेळाचे प्राविण्य प्रमाणपत्र योग्य दर्जाचे असल्याबाबत तसेच तो खेळाडू उमेदवार खेळाडूसाठी आरक्षित पदावरील निवडीकरिता पात्र ठरतो, याविषयीच्या पडताळणीकरीता त्यांचे प्राविण्य प्रमाणपत्र संबंधित विभागीय उपसंचालक कार्यालयाकडे अर्ज सादर करण्याच्या दिनांकापूर्वीच सादर केलेले असणे बंधनकारक आहे. अन्यथा प्राविण्य प्राप्त खेळाडूसाठी आरक्षणाकरीता पात्र समजण्यात येणार नाही.

IV) कागदपत्रे पडताळणी / मुलाखतीच्यावेळी खेळाडू उमेदवारांनी विहित अर्हता धारण करीत असल्याबाबत सक्षम प्राधिकाऱ्याने प्रमाणित केलेले प्राविण्य प्रमाणपत्र तसेच त्यांचे प्राविण्य प्रमाणपत्र योग्य असल्याबाबत तसेच खेळाडू कोणत्या संवर्गातील खेळाडूसाठी आरक्षित पदावरील निवडीकरीता पात्र ठरतो, याविषयीचा सक्षम प्राधिकाऱ्याने प्रदान केलेले प्राविण्य प्रमाणपत्र पडताळणीबाबतचा अहवाल सादर केला तरच उमेदवारांचा संबंधित संवर्गातील खेळाडूसाठी आरक्षित पदावर शिफारसी / नियुक्तीकरीता विचार करण्यात येईल.

v) एकापेक्षा जास्त खेळांची प्राविण्य प्रमाणपत्रे असणाऱ्या खेळाडू उमेदवाराने एकाच वेळेस सर्व खेळांची प्राविण्य प्रमाणपत्रे प्रमाणित करण्याकरीता संबंधित उपसंचालक कार्यालयाकडे सादर करणे बंधनकारक आहे.

**४.७ शैक्षणिक अर्हता :-**

(१) ' पशुवैद्यकशास्त्र ' किंवा ' पशुवैद्यकशास्त्र व पशुसंवर्धन ' यामधील पदवी.

(२) राज्य पशुवैद्यक परिषद / भारतीय पशुवैद्यक परिषद कायदा, १९८४ नुसार नोंदणी असणे आवश्यक असून त्यामध्ये नोंदणी केलेला नोंदणी क्रमांक अर्जामध्ये नमूद करावा.

४.८ प्रस्तुत पदास व्यवसायरोध भत्ता अनुज्ञेय नाही. तसेच खाजगी व्यवसाय करण्यास परवानगी नाही.

४.९ परिविक्षा कालावधी २ वर्षाचा राहील.

**५. निवडीची पध्दत**

**५.१ प्रस्तुत पदासाठी वस्तुनिष्ठ स्वरुपाची लेखी परीक्षा आणि मुलाखत अशा दोन टप्यामध्ये सदर भरती प्रक्रिया घेण्यात येणार आहे. लेखी परीक्षेचा दिनांक नंतर जाहिर करण्यात येईल. लेखी परीक्षा घेण्यात येणार असल्यामुळे जाहिरातीतील विहित मूळ अर्हता आणि / अथवा अनुभव शिथिल केला जाणार नाही. सदर परीक्षेचा अभ्यासक्रम, परीक्षा योजना, परीक्षेचे माध्यम व इतर बाबी आयोगाच्या वेब साईटवर प्रसिध्द करण्यात आल्या आहेत.**

**५.२ संबंधित परीक्षा ही वस्तुनिष्ठ स्वरुपाची २०० गुणांची असेल. मुलाखत ५० गुणांची असून निवड होण्यासाठी मुलाखतीत किमान २१ गुण मिळविणे आवश्यक आहे. अंतिम गुणवत्ता यादी ही वस्तुनिष्ठ परीक्षेतील व मुलाखतीतील एकत्रित गुणांवर आधारीत राहील.**

५.३ प्रस्तुत जाहिरातीमध्ये भरतीसंदर्भातील संक्षिप्त तपशील दिलेला आहे. अर्ज करण्याची पध्दत, आवश्यक अर्हता, आरक्षण, वयोमर्यादा, शुल्क,निवडीची सर्वसाधारण प्रक्रिया इत्यादीबाबतच्या सविस्तर तपशीलासाठी आयोगाच्या www.mpsc.gov.in या वेबसाईटवरील सरळसेवा भरती अंतर्गत 'उमेदवारांना सर्वसाधारण सूचना' मध्ये उपलब्ध करुन देण्यात आलेल्या माहितीचे कृपया अवलोकन करावे. आयोगाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात आलेली माहिती व जाहिरात अधिकृत समजण्यात येईल.

**६. जे उमेदवार चुकीची माहिती सादर करतील त्यांना या व पुढील सर्व निवडीसाठी अपात्र ठरविण्यात येईल.**

७. **कर्तव्ये व जबाबदा-या** :- प्रस्तुत पदाच्या कर्तव्ये व जबाबदा-या याबाबतचा तपशील आयोगाच्या www.mpsc.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध आहे.

८. सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक २८ एप्रिल २०१५ च्या अधिसुचनेनुसार प्रस्तुत पदास विभागीय संरचना व विभागीय संवर्ग वाटप नियमावली लागू आहे.

९ . **शुल्क :**

१) अमागास उमेदवारांकरिता- **रु. ३७४/-** २) मागासवर्गीय उमेदवारांकरिता - **रु. २७४/-**

१०. अर्ज करण्याची पध्दत –

१०.१ प्रस्तुत परीक्षेसाठी अर्ज फक्त ऑनलाईन पद्धतीने स्वीकारण्यात येतील. इतर कोणत्याही प्रकारे अर्ज स्वीकारण्यात येणार नाहीत.

१०.२ पात्र उमेदवारांना वेब-बेस्ड (**Web-based**) ऑन लाईन अर्ज **https://mahampsc.mahaonline.gov.in** या वेबसाईटद्वारे **दिनांक २३ ऑगस्ट, २०१९ ते दिनांक १३ सप्टेंबर, २०१९** या कालावधीत सादर करणे आवश्यक राहील.

१०.३ ऑनलाईन पद्धतीने अर्ज सादर करण्याच्या सविस्तर सूचना आयोगाच्या https://mahampsc.mahaonline.gov.in तसेच www.mpsc.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

१०.४ विहित पद्धतीने आयोगास अर्ज सादर केल्यानंतर परीक्षा शुल्क भरल्याशिवाय अर्ज विचारात घेतला जाणार नाही.

१०.५ आयोगाने निश्चित केलेले परीक्षा शुल्क खालील पद्धतीने भरता येईल :-

१) भारतीय स्टेट बँकेमध्ये चलनाव्दारे (२) नेटबँकिंग (३) डेबीट कार्ड (४)क्रेडिट कार्ड (५) संग्राम केंद्र/ सीएससी (नागरीक सेवा केंद्र)

१०.६ www.mahaonline.gov.in व https://mahampsc.mahaonline.gov.in येथे संग्राम केंद्र (ग्रामपंचायतींमध्ये) आणि सीएससी ची सूची उपलब्ध आहे.

१०.७ परीक्षा शुल्काचा भरणा करण्याकरिता उमेदवारांनी खाली नमूद केलेल्या पद्धतींचा अवलंब करावा :-

(१) शुल्क भरण्याकरिता मुख्य पृष्ठाच्या डाव्या भागावरील " माझे खाते " या लिंक वर क्लिक करावे.

(२) " माझे खाते " या लिंक वर क्लिक केल्यानंतर उमेदवाराने अर्ज केलेल्या पदांची यादी शुल्क भरल्याच्या / न भरल्याच्या नोंदीसह दिसेल. ज्या पदासमोर ' **Unpaid** ' असे लिहिलेले असेल, त्या ठिकाणी '**Pay Now**' अशी लिंक उपलब्ध असेल.

(३) "**Pay Now**" या लिंक वर क्लिक केल्यानंतर 3 पर्याय उपलब्ध होतील. (१) ऑनलाईन पेमेंट (२) नागरी सुविधा केंद्र (३) चलनाद्वारे

(४) उमेदवार क्रेडिट कार्ड, डेबिट कार्ड अथवा नेटबँकिंगच्या सहाय्याने ऑनलाईन पेमेंट करु शकतील.

(५) नागरी सुविधा केंद्र हा पर्याय निवडल्यास, उपलब्ध होणा-या पावतीची प्रत घेऊन नागरी सुविधा केंद्र अथवा संग्राम केंद्रात जाऊन शुल्काचा भरणा केला जाऊ शकतो. उपरोक्त कार्यवाही अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकापूर्वी पूर्ण करणे आवश्यक राहील.

(६) उमेदवाराने चलनाद्वारे हा पर्याय निवडल्यास, उपलब्ध होणा-या चलनाची प्रत घेऊन भारतीय स्टेट बँकेच्या कोणत्याही शाखेत, बँकेच्या कार्यालयीन वेळेत शुल्काचा भरणा केला जाऊ शकतो.

(७) ज्या उमेदवारांना भारतीय स्टेट बँकेमध्ये चलनाद्वारे शुल्क भरावयाचे आहे असे उमेदवार अर्ज सादर केल्याच्या दोन तासानंतर अथवा शेवटच्या दिवशी अर्ज सादर करणा-या उमेदवारांनी त्यापुढील कामकाजाच्या दिवशी बँकेच्या कार्यालयीन वेळेत परीक्षा शुल्क भरणे आवश्यक आहे.

११. लेखी परीक्षेपूर्वी ७ दिवस अगोदर उमेदवारास प्रवेश प्रमाणपत्र त्याच्या प्रोफाईलव्दारे उपलब्ध करुन देण्यात येईल. त्याची प्रत उमदेवाराने लेखी परीक्षेपूर्वी डाऊनलोड करुन घेणे व लेखी परीक्षेच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे.

१२. लेखी परीक्षेच्या वेळी उमेदवाराने प्रवेश प्रमाणपत्र आणणे सक्तीचे आहे. त्याशिवाय लेखी परीक्षेस प्रवेश दिला जाणार नाही.

१३. समांतर आरक्षणाबाबत शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक एसआरव्ही- १०१२/प्र.क्र.१६/१२/१६-अ, दि. १३ ऑगस्ट, २०१४ वरील शासन शुध्दीपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक संकीर्ण-१११८/प्र.क्र. ३९/१६-अ, दि. १९ डिसेंबर, २०१८ आणि तदनंतर शासनाने यासंदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार कार्यवाही करण्यात येईल.

१४. महिलासाठी आरक्षित पदांकरिता दावा करणाऱ्या उमेदवारांनी महिला आरक्षणचा लाभ घ्यावयाचा असल्यास त्यांनी अर्जामध्ये न चुकता महाराष्ट्राचे अधिवासी (Domiciled) असल्याबाबत तसेच नॉन क्रीमीलेयर मध्ये मोडत असल्याबाबत (अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती वगळून) स्पष्टपणे दावा करणे आवश्यक आहे.

१५. सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागासवर्गातील ( एसईबीसी ) उमेदवारांकरीता शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्रमांक: सीबीसी १०/ २०१८/ प्र. क्र. १३०/ मावक, दिनांक ७ डिसेंबर, २०१८ अन्वये विहित करण्यात आलेले जातीचे प्रमाणपत्र ,कागदपत्र पडताळणीच्या वेळी सादर करणे आवश्यक राहील. तसेच, शासन निर्णय सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्रमांक : सीबीसी- १०/२०१३/ प्र. क्र. ३५/ मावक, दिनांक १५ जुलै, २०१४ अन्वये शैक्षणिक व सामाजिकदृष्टया मागासवर्गाकरीता (ईएसबीसी) देण्यात आलेली जात प्रमाणपत्रे सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागासवर्गातील (एसईबीसी) आरक्षणाकरीता ग्राहय धरण्यात येतील.

१६. आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांतील (ईडब्लूएस) उमेदवारांकरीता शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : राआधो- ४०१९/ प्र. क्र.३१/ १६-अ, दिनांक १२ फेब्रुवारी, २०१९ अन्वये विहित करण्यात आलेले प्रमाणपत्र, कागदपत्र पडताळणीच्या वेळी सादर करणे आवश्यक राहील.

१७. मागासवर्गीय उमेदवारांनी त्यांच्या वर्गवारीसाठी देय असलेली वयोमर्यादा / परीक्षाशुल्क यामध्ये सवलत घेतली असेल तरीही त्यांचा खुल्या प्रवर्गातील पदावरील शिफारसीकरीता विचार होत असल्याने, सर्व मागासवर्गीय उमेदवारांनी त्यांच्या प्रवर्गासाठी पद आरक्षित / उपलब्ध नसले तरी, अर्जामध्ये त्यांच्या मूळ प्रवर्गासंदर्भातील माहिती अचूकपणे नमूद करणे बंधनकारक आहे.

१८. मुलाखतीसाठी अर्हताप्राप्त ठरलेल्या उमेदवारांना, मुलाखतीचे वेळी सर्व आवश्यक मूळ प्रमाणपत्रे सादर करणे बंधनकारक आहे. सदर मूळ प्रमाणपत्रे मुलाखतीचे वेळी सादर न केल्यास अथवा ती योग्य नसल्यास मुलाखत घेण्याचे नाकारले जाईल, याची कृपया नोंद घ्यावी.

**१९. आयोगाच्या कार्यालयात, परीक्षा कक्षात, परीक्षा केंद्राच्या परिसरात तसेच मुलाखतीच्या वेळी मोबाईल फोन अथवा इतर कोणत्याही प्रकारची इलेक्ट्रॉनिक किंवा संपर्क साधने आणण्यास वा वापरण्यास सक्त मनाई आहे.**

**२०. विहित पध्दतीने अर्ज सादर करुन ऑनलाईन शुल्क भरण्याची, तसेच स्टेट बँकेमध्ये परीक्षा शुल्क भरण्याकरिता चलनाची प्रत घेण्याची कार्यवाही दिनांक १३ सप्टेंबर, २०१९ रोजी २३.५९ वाजेपर्यंत पूर्ण करणे आवश्यक आहे. त्यानंतर सदर वेबलिंक बंद होईल.**

**२१. चलनाद्वारे परीक्षा शुल्क भरावयाचे झाल्यास भारतीय स्टेट बँकेमध्ये दिनांक १६ सप्टेंबर, २०१९ पर्यंत बँकेच्या कार्यालयीन वेळेत भरणे बंधनकारक आहे. विहित दिनांकानंतर परीक्षा शुल्क भरल्यास वैध मानले जाणार नाही, तसेच परीक्षा शुल्काचा परतावाही केला जाणार नाही.**

**ठिकाण :- मुंबई**
**दिनांक :- २३/०८/२०१९**

**उपसचिव,(सरळसेवा-१)**
**महाराष्ट्र लोकसेवा आयोग**